॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


*** सुविचार ***

जर तुम्हाला आनंदी जीवन जगायचे असेल तर ते एखाद्या ध्येयाशी बांधा, लोकांशी किंवा गोष्टींशी नाही.







■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. १० नोव्हेंबर २०२४ ■ वर्ष ५ वे ■ अंक २२८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145




**इतर कारखान्यांनी गणेशच्या कार्यक्षेत्रातील ऊस नेऊ नये**

पान क्र. २ वर



**भाजप नेते राजेंद्र मस्के हे राहूल जगताप यांच्या साथीला**

पान क्र. ३ वर



**मोनिका राजळेंना पुन्हा विधानसभेत पाठवा : रावसाहेब दानवे**

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### मविआचा जाहीरनामा आज प्रसिद्ध होणार

● **मुंबई** – विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या संयुक्त जाहीरनाम्याचे आज प्रकाशन करण्यात येणार आहे. नरिमन पॉइंट येथील ड्रायटंड हॉटेलमध्ये महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत जाहीरनामा प्रकाशित होईल. महाविकास आघाडीच्या ६ तारखेला झालेल्या संयुक्त जाहीर सभेत ५ गॅरंटी जाहीर करण्यात आल्या होत्या. हॉटेल ड्रायडंटमध्ये दुपारी महाविकास आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद होणार आहे. यावेळी महाविकास आघाडीच्या संयुक्त जाहीरनामा प्रकाशित करण्यात येईल. यावेळी शिवसेना नेते खासदार संजय राऊत, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अध्यक्ष के. सी. वेणुगोपाल, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरात, खासदार वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित राहाणार आहेत.

### भाजीपाल्याच्या दरात वाढ

● **मुंबई** – राज्यात निवडणुकांच्या तोंडावर भाज्यांचे भाव वाढत आहेत आणि ही महागाई शेतक-यांसाठी लाभदायक ठरू शकते. दिवाळीनिमित्त कमी झालेले फळांचे आणि पालेभाज्यांचे दर आता वाढायला सुरुवात झाली आहे. सध्या किरकोळ बाजारात कांदा ८० रुपये किलो दराने विकला जात आहे. नवीन कांद्यांचे दर वाढले असून जुन्या कांद्याच्या विक्रीत वाढ झाल्याने कांद्याच्या दरात काहीशी वाढ झाली आहे. मागच्या आठवड्यात बाजार समितीमध्ये कांद्याचा दर १८ ते ४८ रुपये किलो दरम्यान होता. आता तोच कांद्याचा दर ३५-६२ रुपये किलोवर पोहोचला आहे. किरकोळ बाजारात कांदा ७५-८० रुपये दराने विकला जात आहे. तसेच लसूण बाजारात ३५०-४०० रुपये दराने विकला जात आहे. त्याचप्रमाणे मेथीची जुडी बाजारात ३० रुपये किलो दराने विकली जात असून या वाढत्या मागणीमुळे शेतकऱ्यांना अधिक नफा मिळू शकतो. हिवाळ्यात लोकप्रिय असलेल्या भाज्यांमध्ये शेवग्याच्या शेंगांचा दर बाजारात १३० रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे.

# मतदानासाठी १२ ओळखपत्र ग्राह्य धरणार !


## कोणताही एक पुरावा दाखवल्यावर मतदान करता येणार

● **मुंबई । वीरभूमी** –

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून मतदान करण्यासाठी, ज्या मतदारांचे मतदार यादीत नाव आहे, अशा मतदारांसाठी निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे स्पष्ट केले. १२ प्रकारच्या ओळखपत्रांपैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदान करता येणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये



आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत देण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचा-यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

### ओळखपत्रासोबत मतदार माहिती चिठ्ठी घेऊन जा

■ एखाद्या मतदाराने मतदार यादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्रा धरले जाईल. मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्त्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान दिनांकाच्या किमान ५ दिवस आधी मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण केले जाईल. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती-चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्रासोबत घेऊन यावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले.

## ज्याचे आमदार जास्त, त्याचा मुख्यमंत्री

### 'मविआ'च्या मुख्यमंत्री पदाचा पत्ता शरद पवारांनी टाकला!

● **मुंबई । वीरभूमी**–

निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण असेल अशी चर्चा सुरू असताना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी एक महत्वपूर्ण वक्तव्य केलं आहे. विधानसभा निवडणुकीनंतर आम्ही सगळे एकत्र बसू, ज्यांचे आमदार जास्त त्या पक्षाला मुख्यमंत्रिपदासाठी आम्ही पाठिंबा देऊ. तशी माझ्या पक्षाची भूमिका आहे असं शरद पवारांनी स्पष्ट केलं.

एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना शरद पवारांनी हे वक्तव्य केलं आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस हे काय भूमिका घेतात याकडे सा-यांचे लक्ष लागले आहे.

महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री कोण असेल असा प्रश्न शरद पवार यांना विचारण्यात आला. त्यावर शरद पवार म्हणाले की, निवडणुकीनंतर आम्ही सगळे एकत्रित बसू. ज्यांच्या पक्षाचे आमदार जास्त असतील त्यांना त्यांचा प्रतिनिधी निवडायला सांगू आणि त्याला आम्ही पाठिंबा देऊ. ही माझ्या पक्षाची भूमिका आहे.

राज्यात ज्यावेळी विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या तेव्हापासून महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी घेतली होती. महाविकास आघाडीचा जो कोणीही उमेदवार असो, त्याच्या पाठीशी आपण राहू असंही उद्धव ठाकरे म्हणाले होते. तर उद्धव ठाकरे यांना महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा अशी भूमिका शिवसेनेच्या नेत्यांनी घेतली होती.

## आमदार अपात्रतेप्रकरणी १० डिसेंबरला सुनावणी

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–

महाराष्ट्रात निवडणूक लागली तरी महाराष्ट्र सत्तासंघर्षाचा फैसला सर्वोच्च न्यायालयात होऊ शकलेला नाही. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांना काल कार्यालयीन निरोप दिला. आता ते उद्या निवृत्त होत आहेत. त्यामुळे आता राज्यातील सत्तासंघर्षाशी निगडीत सुनावणीसाठी नव्या तारखा जाहीर केल्या आहेत. अर्थात, सुनावणीच्या तारखा तात्पुरत्या असून त्या बदलू शकतात. नवीन तारखांनुसार शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणी १० डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चिन्ह आणि नावाच्या वादावर १३ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे. शिवसेना पक्ष चिन्ह आणि नाव वादावर १८ नोव्हेंबर रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे. विधानसभा अध्यक्षांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात दिलेल्या निकालाविरोधात ठाकरे गटाकडून १५ जानेवारी २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानंतर २२ जानेवारी रोजी यासंबंधी पहिली सुनावणी झाली. त्यावेळी शिंदे गटाच्या सर्वच आमदारांना नोटीस बजावली.

७ मार्च रोजी विधानसभा अध्यक्षांसमोरील मूळ सुनावणीची कागदपत्रे मागविली. २३ जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसची आमदार अपात्रता प्रकरणी सुनावणी झाली. त्यानंतर २९ जुलैलाही सुनावणी झाली. याच दिवशी अजित पवार गटाच्या आमदारांना नोटीस बजावली. त्यानंतर यापुढे शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणी सुनावणी एकाच दिवशी मात्र स्वतंत्र होणार असल्याचे जाहीर केले. मात्र, त्यानंतर हे प्रकरण वेळापत्रकात येत गेले. मात्र सुनावणी लांबत गेली. आता नवे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या उपस्थितीत यावर सुनावणी होऊ शकते.

# दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारताचा शानदार विजय

● **डरबन** –

संजू सॅमसनच्या शतकाच्या जोरावर भारताने २०२ धावांचा डोंगर उभारला होता. भारताने दक्षिण आफ्रिकेला सुरुवातीला एकामागून एक तीन धक्के दिले. पण त्यानंतर डेव्हिड मिलर आणि हेन्रीच क्लासिन यांच्यात चांगली भागीदारी पाहायला मिळाली. त्यामुळे भारतीय संघ पराभवाच्या छायेत आल्याचे पाहायला मिळत होते. पण वरुण चक्रवर्तीने या दोघांनाही बाद केले आणि तिथेच भारताने हा सामना जिंकला.

या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेवर ६१ धावांनी मात केली. भारताला तब्बल २७ दिवसानंतर हा विजय मिळू शकला. यापूर्वी भारताला विजय बांगलादेशबरोबरच्या तिसऱ्या टी २० सामन्यात झाला होता. हा सामना १२ ऑक्टोबरला झाला होता. त्यामुळे २७ दिवसांनी भारताला पुन्हा एकदा विजयपथावर पोहोचता आले.



दक्षिण आफ्रिकेने टॉस जिंकून आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला. कारण संजू सॅमसनच्या तुफानापुढे दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांना लोटांगण घालायला लागले. संजूने फक्त चांगली सुरुवातच करून दिली नाही तर सातत्याने तो दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजीवर प्रहार करत राहिला. केशव महाराजच्या गोलंदाजीवर संजूने मारलेला फटका हा नरजेचे पारणे फेडणारा होता. संजू त्यानंतरही थांबला नाही. सलग दोन षटकार लगावले आणि संजूने आपले अर्धशतक पूर्ण केले. पुन्हा एकदा संजू भारतासाठी नायकाची भूमिका बजावत होता. कारण संजूला वगळता अन्य कोणत्याही फलंदाजाला यावेळी मोठी खेळी साकारता आली नाही.

संजूने त्यानंतर सहजपणे शतकाच्या दिशेने कूच केले. संजू नव्वदीत कधी आला, हे कोणालाही समजले नाही. कारण संजूची फलंदाजी ही एवढी शिस्तप्रिय होती की, चाहते त्याच्या फलंदाजीत हरवून गेले होते. संजूने यावेळी फक्त आक्रमक फटके मारले नाहीत तर त्याच्या फटक्यांमध्ये नजाकतही होती. संजूने एकेरी धाव घेत ४७ व्या चेंडूवर आपले शतक पूर्ण केले. संजूचे हे सलग दुसरे टी २० शतक ठरले. भारताकडून टी २० क्रिकेटमध्ये सलग दोन शतके झळकावणारा संजू हा पहिलाच भारतीय खेळाडू ठरला. संजू यावेळी १०७ धावांवर बाद झाला. संजूनंतर भारताचा एकही खेळाडू मोठी फटकेबाजी करू शकला नाही आणि भारताला २०२ धावा करता आल्या.

## चंद्रभागेच्या तीरावर महिला भाविकांसाठी १० चेंजिंग रुम

● **पंढरपूर । वीरभूमी**–

कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल- रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. येणाऱ्या भाविकांना मंदिर समितीकडून मुबलक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच विठुरायाचे दर्शन घेण्यापूर्वी अनेक भाविक चंद्रभागेमध्ये स्नान करतात. महिला भाविकांसाठी चंद्रभागा वाळवंटात स्नान केल्यानंतर कपडे बदलण्यासाठी दहा चेंजिंग रूमची उभारणी करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

कार्तिकी एकादशीचा मुख्य सोहळा १२ नोव्हेंबरला संपन्न होत आहे. त्याआधी वारकरी आणि भाविक श्री क्षेत्र पंढरपुरात दाखल होत आहेत. वारीला येणारे बहुतेक सर्व भाविक विठुरायाच्या दर्शनापूर्वी चंद्रभागा नदीमध्ये स्नान करीत असतात. सदर ठिकाणी महिला भाविकांना कपडे बदलण्याची सोय करण्याच्या दृष्टीने चंद्रभागा नदीपात्रात १० ठिकाणी चेंजिंग रूम बसविण्यात आलेल्या आहेत. याशिवाय, महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चेंजिंग रूमजवळ २४ तास महिला सुरक्षा कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे.

मंदिर प्रशासनाकडून उभारण्यात आलेल्या चेंजिंग रूमद्वारे एकावेळेस ३० ते ४० महिला भाविक कपडे बदलू शकतात. कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेसाठी श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप, पत्राशेड व श्री विठ्ठल सभामंडप येथे चार ठिकाणी हिरकणी कक्षाची उभारणी करण्यात आली आहे. याशिवाय, दर्शनमंडप येथे सॅनिटरी नॅपकिनचीदेखील उपलब्धता करण्यात आली आहे.

SPOT NEWS

## समीना पठाण मानवी हक्क अभियानच्या शहर जिल्हा महिला अध्यक्षपदी

**● नगर । वीरभूमी–**

रामवाडी येथील सामाजिक कार्यकर्त्या समीना मोसिन पठाण यांची मानवी हक्क अभियानच्या शहर जिल्हा महिला अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. जिल्हाध्यक्ष राजेंद्र काळे, शहर जिल्हाध्यक्ष अशोक भोसले व शहर उपाध्यक्ष दिलीप जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पठाण यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी शहर संघटक पोपट भोसले, नितीन चव्हाण, महेश भोसले, संजय अडागळे, रणसिंग मास्तर, सलिम मिर्झा, नामदेव अडागळे, सावित्री भोसले, मनीषा लोखंडे, वर्षा चांदणे, डॅनियल भिंगारदिवे आदी उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष राजेंद्र काळे म्हणाले की, मानवी हक्क अभियानच्या माध्यमातून समाजातील दुर्बल घटकांचे प्रश्न सोडविण्याचे सातत्याने कार्य सुरु आहे. संघटनेच्या माध्यमातून महिला व बालकांचे प्रश्न देखील सोडविण्याचे कार्य सुरु असून, महिलांचे प्रश्न गंभीर बनत असताना, त्याला वाचा फोडण्याचे व त्यांच्या हक्काची जपणुक केली जाणार आहे. यासाठी नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या शहर जिल्हा महिला अध्यक्षपदाची भूमिका महत्त्वाची राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. अशोक भोसले व दिलीप जाधव यांनी महिलांना संघटित करुन त्यांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य समीना पठाण करणार असल्याची भावना व्यक्त करुन त्यांना सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. समीना पठाण यांनी महिलांचे विविध प्रश्न संघटनेच्या माध्यमातून सोडविण्यात येणार आहे. शहरातील प्रत्येक परिसरातून महिलांना संघटनेशी जोडले जाणार असून, त्यांच्या हक्कासाठी संघर्ष केला जाणार असल्याची भूमिका त्यांनी मांडली.

## नगरमध्ये ऑल इंडिया ओपन चेस टुर्नामेंटचा शुभारंभ

**● नगर । वीरभूमी–**

जिल्हा बुध्दीबळ संघटनेच्या वतीने होत असलेल्या बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट हेड व राज्यस्तरीय बास्केटबॉल खेळाडू रविंद्र चिपळूणकर व जिल्हा बुध्दीबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट सर यांनी बुद्धिबळ पटावर चाल देऊन उद्घाटन केले. या स्पर्धेत महाराष्ट्र सह मध्यप्रदेश, ओरिसा, गुजरात, हरियाणा, पश्चिम बंगाल, गोवा, दिव दमण, कर्नाटक, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश एकुण २६५ खेळाडू सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत १३५ खेळाडू आंतरराष्ट्रीय मानांकित खेळाडू सहभागी झाले असून ६ वर्षांपासून ते ८१ वयापर्यंत खेळाडू सहभागी आहेत.स्पर्धेचे प्रास्ताविक व स्वागत सचिव यशवंत बापट सर यांनी सांगितले की हि स्पर्धा संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या विशेष सहकार्यातून व पुढाकाराने हि स्पर्धा होत आहे. दरवर्षी शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशनच्या वतीने ३ स्पर्धा घेतल्या जातात भरघोस बक्षिसे, आकर्षक ट्राफी देऊन खेळाडूंना प्रोत्साहन दिले जात आहे. खेळाडूंना विविध सोयीसुविधा जिल्हा बुध्दीबळ संघटनेच्या वतीने देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या स्पर्धेत पंच म्हणून शार्दुल तापसे सातारा, पवन राठी पुणे, अमरिश जोशी, विलास राजपूत छत्रपती संभाजी नगर, देवेंद्र ढोकळे, रोहित आडकर, सौ. अनुराधा बापट, सौ. रोहिणी आडकर काम पहात आहे. हि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सचिव यशवंत बापट सर, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त पारुनाथ ढोकळे सर, शाम कांबळे, प्रकाश गुजराथी सर, सुनील गुगळे, सुनील जोशी, विष्णू कुद्रे, संजय खडके, चेतन कड, मनिष जसवानी, नवनित कोठारी, दत्ता घाडगे, स्वप्नील भगुरकर आदी परिश्रम घेत आहेत. या स्पर्धेत विक्रमादित्य कुलकर्णी, श्रेयस मुजुमदार, श्रीराज भोसले, इंद्रजित महिंदरकर, आशिष चौधरी, ओम लमखणे, श्वान आशिर्वाद, धृव पाटील हे नामांकित खेळाडू खेळ दाखविणार आहेत.

# इतर कारखान्यांनी गणेशच्या कार्यक्षेत्रातील ऊस नेऊ नये

## व्हा. चेअरमन शिवाजी लहारे । गणेश सहकारी साखर कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदिपन

**● कोपरगाव । वीरभूमी–**

श्री गणेश कारखाना हा प्रतिकूल परिस्थितीतून पुन्हा नव्या जोमाने पुढे जातो आहे. गणेश परिसरातील शेतकऱ्यांना योग्य भाव, कर्मचाऱ्यांना न्याय व सभासद शेतकरी यांचा विश्वास जपण्याचे काम केले जाते आहे. कारखान्याचे मार्गदर्शक आ.बाळासाहेब थोरात आणि युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या माध्यमातून गेले काही वर्षे अनेक अडचणीत गेलेल्या गणेशची घडी बसवण्यात नवीन संचालक मंडळाला यश येते आहे. याच दरम्यान मात्र शेजारील कारखाने गणेशचा कार्यक्षेत्रातील ऊस पळवण्याचे काम करता असा अनुभव मागील हंगामात आला. त्यामुळे त्यांनी चालू हंगामात असे प्रकार करू नये कारण गणेश परिसर हा स्वाभिमानी आहे सर्व काही लक्षात ठेवतो याची जाणीव सर्वांनी ठेवावी, असे गणेश कारखाना माजी व्हा. चेअरमन शिवाजी लहारे यांनी स्पष्ट केले आहे.

गणेश कारखाना ६८ वा बॉयलर अग्री प्रदिपन सोहळा पार पडला, यावेळी आपली भूमिका स्पष्ट करताना ते पुढे म्हणाले की, जर आमचा परिसर गणेश कारखाना तेजीत आल्यावर आनंदी होत असेल तर त्यात कुणी अडथळा आणू नये. एक नैतिक संकेत म्हणून कारखाने आपापल्या कार्यक्षेत्रातील ऊस तोडून नेतात. मात्र दुर्दैवाने एखाद्या युद्धभूमी प्रमाणे गणेश कार्यक्षेत्रातील ऊस नेण्याचे काम काही कारखाने करतात त्यांनी यावेळी असे करू नये अन्यथा गणेश परिसराचे मन दुखावले तर त्याचे त्यांना तोटे होऊ शकतात, हा विनंती वजा इशारा समजून इतरांनी कृती करावी.

राजकिय, सामाजिक भूमिका घेण्यात गणेश परिसर हा अतिशय संवेदनशील मानला जातो. कुणीही इथला ऊस नेण्याचा प्रयत्न केला तर त्यांना दुष्परिणाम होतील. मात्र सहकार्य केले तर त्याची देखील जाणीव आम्ही जपणारे लोक आहोत. यापूर्वी संजीवनी आणि संगमनेर यांनी स्वतः ऊस पुरवठा करून गणेश तारला आहे. तो आदर्श ठेवत इतरांनी केवळ ऊस पळवला नाही तरी या परिसराच्या भूमिकेचा आदर ठेवला असे होईल अशी सर्वांची भावना आहे.


कमी गाळप झालेतर आर्थिक नुकसान कारखाना सहन करतो. पर्यायाने बाजारपेठेला देखील चलन फिरण्यास अडचण येते. यासाठी आमचा ऊस आमचा कारखाना या धोरणाला तडा देण्याचे काम शेजारील काही कारखान्यानी या पूर्वी केले आहे त्यांनी ते करू नये, असे शेवटी लहारे यांनी स्पष्ट केले आहे.



गणेश ही अनेकांची कामधेनू असून कारखाना सुरळीत राहिला आणि अधिक गाळप झाले तर सर्वसामान्य सभासद, कर्मचारी आणि बाजारपेठ तेजीत येण्यास मदत होणार आहे. इथला कार्यक्षेत्रातील ऊस कुणीही बाहेर नेण्याचा प्रयत्न करू नये ते कुणाच्याही हिताचे नसेल याची जाणीव ठेवावी.

**– सुधीर लहारे,** चेअरमन, गणेश कारखाना

## कोपरगाव मतदारसंघातील ३२६ मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ



**● कोपरगाव । वीरभूमी –**

कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पहिली जिल्हास्तरीय तपासणी झालेल्या २७२ मतदान केंद्रांसाठी द्यावयाच्या ३२६ मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया करण्यात आली. निवडणूक निरीक्षक कविथा रामू , निवडणूक निर्णय अधिकारी सायली सोळंके, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थिती ही प्रक्रिया करण्यात आली.

कोपरगाव तहसील येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात झालेल्या या सरमिसळ प्रक्रियेच्यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी महेश सावंत, ईव्हीएम समन्वयक अधिकारी व चंद्रशेखर कुलथे उपस्थित होते.

कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या आवश्यकतेनुसार ३२६ बॅलेट युनिट, ३२६ कंट्रोल युनिट आणि ३५३ व्हीव्हीपॅट यंत्रांची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली. तत्पूर्वी उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती सोळंके यांनी सरमिसळ प्रक्रियेची माहिती दिली.

कोपरगाव विधानसभा मतदार संघासाठी मतदान केंद्राच्या १२० टक्के प्रमाणात बॅलेट आणि कंट्रोल युनिट, तर १३० टक्के प्रमाणात व्हीव्हीपॅट यंत्रे प्राप्त झाली आहेत. ही यंत्रे स्ट्राँग रूममध्ये पोलीस सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आली आहेत. उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत सेवा निकेतन कॉन्व्हेंट स्कूल येथे ईव्हीएमचे जुळवणीचे काम सुरू करण्यात आले, श्रीमती सोळंके यांनी सांगितले.

## आनंदतीर्थ येथे पुन्हा भेट देऊन जैन धर्मीय उपासना पद्धतीतून मिळणारा अध्यात्मिक आनंद मिळवू : पंकजा मुंडे

**● पाथर्डी । वीरभूमी –**

अध्यात्मिक समाधान, ध्यान धारणेतून मिळणारी अनुभूती व प्रचंड सकारात्मक ऊर्जा यामुळे आनंद तीर्थ येथे भेट देऊन मिळणारी शक्ती वेगळीच आहे. येथे आपण पुन्हा दोन दिवसांसाठी निश्चित भेट देऊन जैन धर्मीय उपासना पद्धतीतून मिळणारा अध्यात्मिक आनंद मिळवू, असे मत भाजपच्या नेत्या माजी मंत्री आ. पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले.



आज दुपारी पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथे राजकीय कार्यक्रमा निमित्त मुंडे यांचे आगमन झाले. त्यावेळी त्यांनी कार्यक्रमापूर्वी देशातील जैन धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या आनंद तीर्थ येथे आवर्जून भेट देत आनंद ऋषीजी यांच्या चरण कमलांचे मनोभावे दर्शन घेत तेथील ऊर्जा अनुभवली.

यावेळी विक्रमसिंह पाचपुते, आमदार मोनिका राजळे, शिवाजीराव कर्डिले आदी निवडक कार्यकर्ते उपस्थित होते. तालुक्यातील चिचोंडी येथे जैन धर्मियांचे राष्ट्रसंत आचार्य सम्राट आनंदऋषीजी महाराज यांचे जन्मगाव असून जागतिक पातळीवर वरील जैन धर्मीय उपासक येथे आवर्जून भेट देतात. सुमारे २०० कोटी रुपये खर्चून येथे विविध धार्मिक उपक्रमाचे बांधकाम सुरू आहे. यावेळी चर्चा करताना मुंडे म्हणाल्या, अध्यात्म मार्गातून करावयाची साधना, योग व विविध उपासना पद्धती याची आपल्याला पूर्ण माहिती आहे. यामध्ये आपल्याला विशेष रुची आहे. धर्माचरणाशिवाय दैनंदिन जीवनातील जगण्याची ऊर्जा मिळू शकत नाही. दैनंदिन उपक्रमात आपण ध्यानधारणेसाठी आवर्जून वेळ देतो. राष्ट्रसंत आनंद ऋषीजी महाराजांबद्दल मला माहिती आहे. अतिशय सुंदर व भव्य तीर्थ निर्माण कार्य चिचोंडीत सुरू असून समस्त मानव जातीला प्रेरणा देण्याचे केंद्र हे स्थान ठरणार आहे. निरव शांतता, दर्जेदार, नियोजनबद्ध बांधकाम व विविध साधना अविरतपणे चालू असल्याने या क्षेत्रीय निर्माण झालेली अध्यात्मिक ऊर्जा येथे प्रवेश करता क्षणीच जाणवते. सर्वच महापुरुषांबद्दल आपण माहिती घेतली असून थोरामोठ्यांचे जीवन चरित्र हीच जगण्याची प्रेरणा मानल्यास सर्व परिस्थितीमध्ये मानसिक संतुलन परिपूर्ण राहते व्यक्तीच्या आंतरिक कौटुंबिक सामाजिक ते उन्नतीस अध्यात्माची जोड अत्यंत आवश्यक आहे. दैनंदिन धकाधकीच्या जीवनामध्ये अशा स्थळांना भेट देण्याचा आपला प्रयत्न असतो.

यावेळी आचार्य आनंदऋषीजी महाराजांचे वंशज कमलेश गुगळे, व्यवस्थापक संजय गुगळे यांनी विविध धार्मिक उपक्रमांची व आगामी काळातील कामांची माहिती दिली. सरपंच एकनाथ आटकर यांनी आभार मानले.

## नेवासा विधानसभा मतदारसंघातील ३३१ मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ



**● शिर्डी । वीरभूमी –**

नेवासा विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पहिली जिल्हास्तरीय तपासणी झालेल्या २७६ मतदान केंद्रांसाठी द्यावयाच्या ३३१ मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ प्रक्रिया करण्यात आली. निवडणूक निरीक्षक अरुण कुमार, निवडणूक निर्णय अधिकारी अरुण उंडे, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थिती ही प्रक्रिया करण्यात आली.

नेवासा तहसील येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात झालेल्या या सरमिसळ प्रक्रियेच्यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सोनाली म्हात्रे, नगरपालिका मुख्याधिकारी तथा समन्वयक अधिकारी विशाल यादव, नायब तहसीलदार किशोर सानप, सुरेश भांगे व बी. ए. कसार आदी उपस्थित होते.

नेवासा विधानसभा मतदारसंघाच्या आवश्यकतेनुसार ३३१ बॅलेट युनिट, ३३१ कंट्रोल युनिट आणि ३५८ व्हीव्हीपॅट यंत्रांची दुसरी सरमिसळ संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली. तत्पूर्वी उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना निवडणूक निर्णय अधिकारी उंडे यांनी सरमिसळ प्रक्रियेची माहिती दिली.

नेवासा विधानसभा मतदार संघासाठी मतदान केंद्राच्या १२० टक्के प्रमाणात बॅलेट आणि कंट्रोल युनिट, तर १३० टक्के प्रमाणात व्हीव्हीपॅट यंत्रे प्राप्त झाली आहेत. ही यंत्रे स्ट्राँग रूममध्ये पोलीस सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आली आहेत.

# मिशन-७५ टक्के पेक्षा अधिक मतदान अभियान यशस्वी करा

## तहसीलदार डॉ. उध्दव नाईक । पाथर्डी शहरात मतदान जनजागृती अभियान

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शेवगाव-पाथर्डी विधानसभा निवडणुकीत मतदारांनी विक्रमी मतदान करून सर्व मतदान केंद्रामध्ये मिशन ७५ टक्के पेक्षा अधिक मतदान घडवून आणण्यासाठी सर्व शासकिय निमशासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन तहसीलदार तथा सहायक निवडणुक अधिकारी डॉ. उध्दव नाईक यांनी केले.

मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे ५ नोव्हेंबर २०२४ चे संदर्भित पत्रकान्वये आज पाथर्डी तालुक्यातील सर्व शासकिय निमशासकीय कार्यालये, तहसिल कार्यालय, पाथर्डी, पंचायत समिती, पाथर्डी नगरपरिषदमध्ये मतदान शपथ घेण्यात आली. त्या प्रसंगी डॉ. नाईक हे बोलत होते. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानची टक्केवारी अधिकाधिक वाढावी म्हणुन नागरिकांमध्ये मतदान करण्याबाबत मतदान जनजागृतीपर उपक्रम स्वीप कार्यक्रम अंतर्गत तालुक्यात राबविण्यात येत असेल बाबत तालुका नोडल अधिकारी रामनाथ कराड व सर्व स्वीपचे सदस्यचे डॉ. नाईक यानी अभिनंदन केले. कार्यक्रमांचे प्रास्तविक रामनाथ कराड यांनी केले, ८ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर अखेर मतदारसंघात मतदार शपथ, रांगोळी स्पर्धा, पथनाट्य, विदयार्थी पालकांकडून संकल्पपत्र भरून घेणे, गृह भेटीतून मतदान जागृती अभियान राबविण्यात येत असल्याचे कराड यांनी माहिती दिली. शाहीर भारत गाडेकर, बिपीन खंडागळे व सहकारी यांनी मतदान जागृती गीत गायन केले, प्रसंगी गटविकास अधिकारी श्रीमती एस. आर. पालवे, डॉ. भगवान दराडे, सुधीर देऊळगावकर, विस्तार अधिकारी दत्तात्रय रनमळ, सर्व कर्मचारी उपस्थित होते.



मुख्याधिकारी नगर परिषद पाथर्डी येथे संतोष लांडगे, प्रशासन अधिकारी अमोल मदने, कृष्णा देवढे, शंकर भडके, आकाश माने, मिरपगार मिनिनाथ देवकर, किशोर पारखे यांच्या प्रमुख उपस्थितीत मतदान शपथ घेण्यात आली. कार्यक्रमांचे प्रास्तविक राजेंद्र चव्हाण, सूत्रसंचलन बिपीन खंडागळे यांनी केले तर आभार बाळासाहेब मरकड यांनी केले.

SPOT NEWS



## नगर जिल्ह्याच्या फुटबॉल संघाने नागपूरला नमवून उपांत्य फेरी गाठली

**● नगर । वीरभूमी–**

वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) च्या वतीने शिरपूर (जि. धुळे) येथे सुरु असलेल्या महाराष्ट्र राज्य ज्युनियर आंतरजिल्हा फुटबॉल चॅम्पियनशिप (१५ वर्षा खालील) फुटबॉल स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याच्या फुटबॉल संघाने उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीमध्ये नागपूर जिल्हा संघावर २–१ गोल ने विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. उपांत्य फेरीच्या लढतीमध्ये जिल्हा संघाचा सामना पुणे जिल्ह्याच्या संघाबरोबर होणार आहे. मागील कित्येक वर्षांपासून पुणे, मुंबई, कोल्हापूर आणि नागपूर हे संघ सातत्याने स्पर्धेची उपांत्य फेरी आणि अंतिम फेरी गाठत आहेत. शुक्रवारी (दि.८ नोव्हेंबर) झालेल्या सामन्यात नगर जिल्ह्याच्या संघाने उत्तम कामगिरी बजावत स्पर्धेतील आतापर्यंतच्या सर्वात धक्कादायक निकालाची नोंद केली आहे. विजयी संघासाठी भार्गव पिंपळे आणि भानुदास चंद यांनी मध्यंतरापूर्वी १–१ गोल केला. बचावफळीने उत्तरार्धात सामन्याच्या शेवटीपर्यंत उत्तम बचाव करून सामन्यातील आघाडी कमी होणार नाही याची काळजी घेतली. संघाच्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे सर्व पदाधिकारी आणि सहभागी खेळाडूंचे पालक यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून उपांत्य फेरीसाठी शुभेच्छा दिल्या. जिल्हा संघाचे प्रशिक्षक म्हणून जेव्हिअर स्वामी आणि सहप्रशिक्षक वैभव मनोदिया हे खेळाडूंना उत्तम मार्गदर्शन करत आहेत.

## स्वीप समितीची चला करू मतदान-काव्य स्पर्धेसाठी कविता पाठविण्याचे आवाहन

**● नगर । वीरभूमी–**

श्री सिद्धाराम सालीमठ ,जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,अहिल्यानगर यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी १०० % मतदानाची भूमिका बजवावी त्याचबरोबर मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी व मतदारांमध्ये जनजागृती होण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीच्या वतीने चला करू मतदान या काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. एखादे गाव, शहर, वसाहत यामध्ये बहुभाषी लोक राहतात.विविधतेत एकता दाखवत लोकशाहीमध्ये भाषा माणसं जोडण्याचे महत्त्वाचं काम करते.स्वत:च्या मातृभाषेत देखील लोक आपल्या भावना व्यक्त करतात.जिल्हा स्वीप समितीने विविध भाषांमधील कवी, गीतकार यांना चला करू मतदान या विषयावरील काव्य स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. काव्यलेखन, काव्यगायन व काव्यवाचन अशापैकी एका स्वरूपात कविता स्वरचित असावी, कुठल्याही राजकीय घटकाचा उल्लेख कवितेमध्ये नसावा. १) अहिल्यानगरकरांनो, तुम्ही लोकशाहीची पणती हाती धरा, विधानसभेच्या निवडणुकीत जरूर मतदान करा.२) आपले मतदान २० नोव्हेंबर रोजी आहे. कृपया विसरू नका. ३)अहिल्यानगरीच्या मतदार राजा जागा हो–२० नोव्हें. रोजी लोकशाहीचा धागा हो. यासारख्या संदेशांचा वापर कवितेत करता येईल. कवींनी आपल्या कविता १५नोव्हेंबर २०२४ पर्यंत देशातील पहिल्या अहिल्यानगर स्वीप केअर व्हाट्सअप क्रमांक असलेल्या ९००२१०९००३ या क्रमांकावर संपूर्ण नाव व पूर्ण पत्त्यासह पाठवायचे आहेत.

# भाजप नेते राजेंद्र मस्के हे राहूल जगताप यांच्या साथीला

### श्रीगोंद्यात भाजपाला खिंडार । अनेक कार्यकर्ते राहुल जगतापांच्या प्रचारात सक्रीय

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

भाजप पक्षाचे एकनिष्ठ, जुने जाणते, व कुकडी पाटपाणी समितीचे अध्यक्ष व संघर्षशील शेतकरी नेते राजेंद्र मस्के पाटील यांनी शुक्रवार दि. ९ रोजी मा.आ. राहूल जगताप यांच्या श्रीगोंदा येथील सावली निवासस्थानी भेट घेऊन विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांसह राहूल जगताप यांना बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे.



श्री. मस्के हे भाजपचे जुने नेतृत्व आहे. परंतु दहा बारा वर्षांपासून श्रीगोंदा भाजपात अनेक आयात नेत्यांचा वरचष्मा राहिला आहे. तरीही श्री.मस्के यांनी पक्षाला कधीही सोडचिठ्ठी दिली नाही. स्व. खा. दिलिप गांधी यांचे खास निष्ठावंत म्हणून श्री. मस्के यांची ओळख आहे. राजेंद्र मस्के यांनी महायुतीला सोडचिठ्ठी दिल्यामुळे जुन्या भाजपायी कार्यकर्त्यांची घुसमट होत आहे हे समोर आले आहे.

यावेळी राजेंद्र मस्के म्हणाले की, सध्याच्या भाजपात पक्षनिष्ठेपेक्षा स्थानिक व्यक्तीनिष्ठेला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे भाजपाची मूळ विचारसरणी मागे पडून व्यक्तीस्तोम व घराणेशाही वाढीला लागली आहे. तालुकास्तरावरील कुठल्याही प्रश्नांवर जुन्या कार्यकर्त्यांना विचारात घेतले जात नाही.

अपक्ष उमेदवार राहूल जगताप यांची पाच वर्षांपूर्वीची कारकीर्द विकासात्मक राहून सत्ताधारी व विरोधकांच्यात समन्वयाची भूमिका राहिली आहे. घराणेशाहीमुळे तालुक्याच्या पाटपाणी नियोजन, शेतकऱ्यांचे विविध प्रश्न, शेतमालभाव, सरकारी अधिकाऱ्यांची अनास्था सतत पुढे येत आहे. तर आमदारकी ही मिरवण्यासाठी नसून जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी असते याचा प्रस्थापित नेत्यांना विसर पडलेला आहे. राहूल जगताप यांच्या रूपाने पुन्हा एकदा श्रीगोंदा तालुक्याचा विकास साधण्यासाठी अपक्ष उमेदवार राहूल जगताप यांच्याबरोबर काम करणार असून माझ्यासह शेकडो शेतकरी राहूल जगताप यांना आमदार करण्यासाठी पूर्णवेळ काम करणार आहोत.

यावेळी अपक्ष उमेदवार राहूल जगताप, मनोहर पोटे, हरिदास शिर्के, स्मितल वाबळे, अजित जामदार, राजू पाटील, प्रमोद मस्के व मोठ्या संख्येने शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संत महंतांकडूनच विस्कटलेली समाजाची घडी बसवली जाऊ शकते : माधवबाबा

**● पाथर्डी । वीरभूमी–**

अध्यात्माची कास धरून समाजोद्धाराचे कार्य करत लोकांना दिशा दाखवण्याची संतांची परंपरा शंकर महाराजांनी चालवली. जगाच्या कल्याणासाठी सेवा धर्म, नीती धर्म डोळ्यापुढे ठेवून समाजाच्या कल्याणासाठी साधुसंतांनी प्रयत्न करावेत. सद्य परिस्थितीत संत महंतांकडूनच विस्कटलेली समाजाची घडी बसवली जाऊ शकते, असे मत शंकर महाराज मठाचे महंत माधव बाबा यांनी व्यक्त केले.

शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त मठामध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते शिरसगाव नेवासे येथील भक्त रवि देशमुख यांचे हस्ते पहाटे मूर्तीची व पादुकांची महापूजा झाली त्यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले या सोहळ्यासाठी सुरत, ठाणे, पनवेल, संभाजीनगर, पुणे अहिल्यानगर, बीड यासह जिल्ह्याच्या विविध भागातून भाविक उपस्थित होते उपस्थित पाहुणे मंडळींनी महंतांची वैयक्तिक पूजा म्हणजे गुरुपूजन केले शंकर महाराज स्वरूप माधवबाबांचे पाद्यपूजन केले.

यावेळी बोलताना माधव बाबा म्हणाले, धर्म, जाती, पंथ, लिंग यापुढे जाऊन शंकर महाराजांनी समस्त मानव जातीच्या कल्याणार्थ काम केले. अनितीने वागू नका. सत्याचा मार्ग सोडू नका. भुकेलेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी व गरजूला मदत करा. प्रत्येक सजीव प्राण्यांसह चराचर सृष्टीत ईश्वराचे अस्तित्व असल्याने दैनंदिन जगताना कृतज्ञतेचा भाव ठेवा. सत्कर्माचे उच्चारण वारंवार न करता इतरांना प्रेरणा देत राहा.

संकटाच्या वेळी अन्य मार्गाचा अवलंब न करता ईश्वराला अनन्य भावाने शरण जा कोणत्याही रूपाने मदतीचा हात पुढे येऊन ईश्वराची प्रचिती हमखास जाणवते. कलियुगात प्रत्येक चांगल्या वाईट कर्माचे फळ प्रत्येकाला भोगावेच लागते. नि:स्वार्थ सेवा भाव माणसांमध्ये ईश्वरी गुण वेगाने वाढवतो. अशा स्वरूपाची सोपी शिकवण देणाऱ्या शंकर महाराजांचे अवतरण अत्यंत गुढ असून त्यांचे लिला कार्य त्यापेक्षा गुढ आहे.

अनेक सिद्धी व प्रचंड आध्यात्मिक ताकद असूनही त्यांनी कधी त्याचे प्रदर्शन केले नाही. देवाधिदेव महादेवाचा अवतार म्हणूनच त्यांच्याकडे भाविक बघतात अवतार कार्यात त्यांनी स्वामी समर्थांना गुरु स्वरूप मानल्याने दत्त सांप्रदायाची सुद्धा भाविक शंकर महाराजांची उपासना तेवढ्याच निष्ठेने करतात पाथर्डी येथील मठामध्ये महाराजांनी वापरलेला लोखंडी पलंग आहे. अनेक भाविकांना पाथर्डीच्या मठाबाबत दृष्टांत होत असल्याने येथे येणाऱ्या भाविकांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

## शेतकरी आणि नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठवणार : काशिनाथ दाते

**● पारनेर । वीरभूमी –**

मी माझे आजपर्यंतचे राजकारण सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून केले आहे. आताची माझी ही निवडणूक विकासाच्या मुद्यावर आहे असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी जवळा ता. पारनेर येथे गावभेट दौऱ्यात झालेल्या सभेत दाते केले. पारनेर–नगरची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला सुटल्यानंतर माझी उमेदवारी निश्चित होताच सर्वात प्रथम भारतीय जनता पार्टीची मदत मला झाली. पारनेर तालुक्यातील भाजपाची संघटना अतिशय मजबूत असून भाजप नेत्यांनी माझ्या प्रचाराला सुरुवात केली तर नगर तालुक्यातील प्रचारात मला प्रकर्षाने जाणवले की माझ्या निवडणुकीच्या विजयात माझ्या महिला भगिनींचा सर्वात मोठा वाटा असणार आहे.



यावेळी भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, राष्ट्रवादीचे प्रथम जिल्हाध्यक्ष प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादीचे नूतन जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, सभापती गणेश शेळके, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, सचिन पाटील वराळ, पंकज कारखिले, भाजपाच्या महिला तालुकाध्यक्षा सोनाली सालके, राष्ट्रवादीच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, नवनाथ सालके, कृष्णाजी बडवे यांसह स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

काशिनाथ दाते यांनी उपस्थित शेतकरी आणि नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की, आम्ही शेतकरी आणि नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी नेहमी तयार आहोत. आमचा प्रचारदौरा या भागातील विकासासाठी आणि शेतकरी कल्याणासाठीच आहे. अजित दादांनी केलेली अतिशय लोकप्रिय घोषणा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभार्थी असलेल्या माझ्या लाडक्या बहिणी या योजनेवर अतिशय खुश आहेत. महिलांच्या चेहऱ्यावर मला ते प्रकर्षाने जाणवत असून या सरकारने अनेक कल्याणकारी योजना राबवल्या आहेत. म्हणून हे सरकारला पुन्हा एकदा निवडून येणार आहे. केंद्रात आणि राज्यात एकाच विचाराचे सरकार असल्यास राज्याचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय राहणार नाही. मी स्वभावाने शांत असलो तरी अन्यायाचा प्रतिकार केल्याशिवाय राहणार नाही. मी निवडणुकीला उभे राहू नये म्हणून अनेक अडथळे निर्माण केले, माझ्यावर बालंट आणण्याचे प्रकार केले. खोटेनाटे आरोप माझ्यावर केले, माझे मनोधैर्य खचविणयाचे प्रयत्न झाले. मला निवडणुकीतून बाजूला करण्याचा डाव रचला, परंतु मला विश्वास आहे माझ्यावर कितीही आरोप केले तरी माझी पारनेरची जनता त्यावर विश्वास ठेवणार नाही. मी जाहीरपणे सांगतो कोणत्याही दमबाजीला घाबरू नका. आपण खंबीर व्हा, आमदार पदाचा वापर सर्वसामान्यांच्या हितासाठी सर्वसामान्यांची कामे करण्यासाठी करावा लागतो.

## संगीत रसिकांसाठी रविवारी 'सूर बतियाँ'

**● नगर । वीरभूमी–**

स्पर्धात्मक वातावरणात संगीताचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे व त्यांना योग्य मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने रविवारी (दि. १०) माऊली सभागृहात सायंकाळी साडेसहा वाजता 'सूर बतियाँ' हा आगळावेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. संगीत अभ्यासक आणि सुप्रसिद्ध गायिका सायली पानसे लिखित 'गंधार' या पुस्तकावर आधारित शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, चित्रपट संगीत अशा विविध गीतप्रकारांवर संगीत विषयक गप्पांच्या आणि संगीताच्या माध्यमातून माहिती देणारा हा कार्यक्रम श्री गुरूमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे रजिस्ट्रार विश्वास जाधव, ज्येष्ठ संगीततज्ञ प्रा. रेवण्णाथ भनगडे, गुरुवर्या कुमुदिनी बोपर्डीकर, गायक डॉ. निरज करंदीकर, लक्ष्मण डहाळे, प्रा. तानाजी जाधव, प्रा. निलेश खळीकर आदी उपस्थित होते.

# निवडणूक कामकाजाबाबत उमेदवारांना वेळोवेळी माहिती द्यावी : निवडणूक निर्णय अधिकारी कविथा रामू

**● शिर्डी । वीरभूमी –**

विधानसभा निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यात पारदर्शकता जपत उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना निवडणूक कामकाजाबाबत वेळोवेळी माहिती देण्यात यावी, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी कविथा रामू यांनी दिले.

शिर्डी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत त्या बोलत होत्या. याप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी माणिक आहेर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल मोरे, नगरपालिका मुख्याधिकारी वैभव लोंढे, नायब तहसीलदार मनोज भोसेकर, बाळासाहेब मुळे आदी उपस्थित होते.

श्रीमती रामू म्हणाल्या, उमेदवारांनी प्रचार करताना सर्व बाबींची परवानगी घेऊनच त्यावर अंमल करावा, आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, निवडणुका निकोप व पारदर्शक वातावरणात होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे



आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी आदर्श आचारसंहिता, निवडणूक खर्च मर्यादा, विविध परवानग्यांसाठी एक खिडकी कक्ष, प्रचार साहित्य छपाई बाबत आयोगाच्या सूचना, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांनी प्रकाशित करावयाची माहिती आदी विषयांवर निवडणूक निर्णय अधिकारी आहेर यांनी उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना मार्गदर्शन केले.

यावेळी आचारसंहिता कक्षामार्फत देण्यात आलेल्या विविध परवानग्या, टपाली मतदान, गृह मतदान, मतदानाच्या दिवशीची तयारी, मतदान साहित्य वाटप, संवेदनशील मतदान केंद्रे आणि तेथील पोलीस बंदोबस्त याविषयी निवडणूक निर्णय अधिकारी आहेर यांनी निवडणूक निरीक्षक श्रीमती कविथा रामू यांना माहिती दिली.

## अकोले मतदारसंघातील ३६८ मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पहिली जिल्हास्तरीय तपासणी झालेल्या ३०७ मतदान केंद्रांसाठी द्यावयाच्या ३६८ मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया करण्यात आली. निवडणूक निरीक्षक हौलीनलाल गौईटे, निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थिती ही प्रक्रिया करण्यात आली.

अकोले तहसील येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात झालेल्या या सरमिसळ प्रक्रियेच्यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सिध्दार्थ मोरे व नगरपरिषद मुख्याधिकारी तथा समन्वयक अधिकारी पंकज गोसावी आदी उपस्थित होते.

अकोले विधानसभा मतदारसंघाच्या आवश्यकतेनुसार ३६८ बॅलेट युनिट, ३६८ कंट्रोल युनिट आणि ३९९ व्हीव्हीपॅट यंत्रांची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली. तत्पूर्वी उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना निवडणूक निर्णय अधिकारी उंडे यांनी सरमिसळ प्रक्रियेची माहिती दिली.

अकोले विधानसभा मतदार संघासाठी मतदान केंद्राच्या १२० टक्के प्रमाणात बॅलेट आणि कंट्रोल युनिट, तर १३० टक्के प्रमाणात व्हीव्हीपॅट यंत्रे प्राप्त झाली आहेत. ही यंत्रे स्ट्राँग रूममध्ये पोलीस सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आली आहेत. दुसरी सरळमिसळ प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना स्ट्राँग रूममध्ये घेऊन जाऊन दाखविण्यात आली. १० नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून ही यंत्रे मतदानाच्या दृष्टीने तयार करण्याच्या प्रक्रियेला सुरूवात होणार आहे, असे श्री.यादव यांनी सांगितले.

# महायुतीचे सरकार आणण्यासाठी मोनिका राजळेंना पुन्हा विधानसभेत पाठवा

## माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे । अमरापूर येथे महायुतीच्या उमेदवार मोनिका राजळेंच्या प्रचारार्थ सभा

**● शेवगाव । वीरभूमी –** उद्धव ठाकरे यांच्या काळात झालेली सरकारची ठोस कामे सांगा. महायुतीच्या काळात झालेली कामे पहा. दोन्ही सरकारच्या कामाची तुलना शेतकऱ्यांनी करावी. शेतीमध्ये सरकारने गुंतवणूक केल्याशिवाय शेती किफायतशीर होणार नाही. मागेल त्याला सौरपंप, शेतीपंपाची विजबील माफी आणि शेतकऱ्यांना एक रुपयात पिक विमा, माझी लाडकी बहीण योजना आणि शेतकरी सन्मान योजना हे महायुती सरकारची कामे शेतकरी हिताची आहेत. शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीच चांगले निर्णय घेवू शकतात.त्यांच्याच काळात शेतकरी हिताच्या योजना दिल्या गेल्या. महायुतीचे सरकार आणण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांना पुन्हा विधानसभेत पाठवा, असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे राज्याचे प्रचार प्रमुख माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी केले.

तालुक्यातील अमरापुर येथे आमदार मोनिका राजळे यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभेमध्ये ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार मोनिका राजळे, अभय आव्हाड, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, अश्विनी थोरात, सुवेंद्र गांधी, अशोकराव चोरमले, शिवसेना जिल्हाध्यक्ष शोभा अकोलकर, आशाताई गरड, बापूसाहेब पाटेकर, संदीप खरड, दिनेश लव्हाट, संदीप वाणी, भीमराज सागडे, राजेंद्र जमधडे, बापूसाहेब भोसले, शिवाजी समिंदर, गंगाभाऊ खेडकर, डॉ. मृत्युंजय गर्जे, अमोल गर्जे, मुकुंद गर्जे, बाबा राजगुरु, यांच्यासह भाजप, राष्ट्रवादी व शिवसेना, आरपीआय व मित्र पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

यावेळी बोलताना दानवे म्हणाले, मागील निवडणुकीत शिवसेना –भाजपा युतीला जनतेने कौल दिला. उद्धव ठाकरे यांनी लगेच सर्व पर्याय खुले असल्याचे सांगुन शरद पवार व काँग्रेस सोबत अनैसर्गिक सरकार स्थापन केले. त्यांच्या काळात एकही शेतकरी हिताची योजना राबविली का? असा प्रश्न उपस्थीतांना विचारला. माझं कुंटुब माझी जबाबदारी म्हणत त्यांनी जनतेला वाऱ्यावर सोडुन दिले, अडीच वर्षे घरात बसले. त्यांच्यात वाद होवुन एक गट फुटला आणि आमच्यात आला. मग महायुतीचे सरकार आले. या काळात शेतकरी जनहिताच्या योजना राबविल्या असे दानवे म्हणाले.

महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, महाभकास आघाडीचे सरकार अडीच वर्षे सत्तेत होते. आता ते महीलांना तीन हजार देवू म्हणतात, त्यावेळेस सत्तेत असताना का दिले नाहीत, तेव्हा झोपले होते का? पंकजाताई मुंडे यांनी ग्रामविकासमंत्री असताना या भागात मोठा निधी दिला. आमदार मोनिका राजळे यांनी शेवगाव, पाथर्डीचा विकास केला ही मोठी गोष्ट आहे. महीलेने नेतृत्व करावे ही अभिमानाची गोष्ट आहे. राजकारणात



दिवसा इकडे आणि रात्री तिकडे हा घोटाळा दुरुस्त करता आला पाहीजे. शरद पवार कृषीमंत्री होते, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते. त्यांनी शेतकऱ्यांना का काही दिले नाही. शेवगाव-पाथर्डीत जागा उपलब्ध करुन द्या, मेगा प्रकल्प देवुन युवकांना रोजगार देवू. नगर, शिर्डी व बेलवंडी येथील औद्योगिक वसाहतीमधुन दोन वर्षात दहा हजार युवकांना रोजगार दिला जाईल.

यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. आमदार मोनिका राजळे यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करण्याचा सामुहीक संकल्प करण्यात आला. सुत्रसंचालन राजीव सुरवसे यांनी केले तर श्रीकांत मिसाळ यांनी आभार मानले.

# कोपरगाव शहराला जिल्ह्यात एक नंबर करणार : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी–** कोपरगाव मतदार संघाच्या समस्या काय आहेत याचा बारकाईने अभ्यास करून हे प्रश्न कसे सोडविता येतील त्याचा देखील पूर्णपणे अभ्यास केला होता. त्यामुळे या पाच वर्षात मतदार संघातील जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करू शकलो असलो तरी यापुढील काळात विकासाबरोबरच कोपरगावची बाजारपेठ फुलविण्यावर भर देणार असल्याचे महायुतीचे उमेदवार आ.आशुतोष काळे यांनी सांगितले आहे.

कोपरगाव शहरातील टिळकनगर या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या कॉर्नर सभेत ते बोलत होते. यावेळी आ.आशुतोष काळे म्हणाले की, कोपरगाव मतदार संघासह कोपरगाव शहराचे अनेक विकासाचे प्रश्न होते. हे प्रश्न मी सहजपणे सोडवू शकतो याची मला खात्री होती त्यामुळे मी बिनदिक्कतपणे मतदार संघातील जनतेला आश्वासित केले.जनतेने देखील माझ्यावर विश्वास दाखविला आणि मी देखील




संपूर्ण मतदार संघातील रस्ते, वीज, पाणी, आरोग्य आदी महत्वाचे प्रश्न या पाच वर्षात सोडविले आहे.

पाणी, रस्ते, वीज, आरोग्य, स्वच्छता या तर आपल्या मूलभूत गरजा आहेत परंतु त्याचबरोबर कोपरगाव शहरातील बाजारपेठ फुलविणे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. आपल्या शहराला जिल्ह्यात एक नंबर कसे करता येईल, यासाठी मी प्रयत्न करणार आहे. कोपरगाव शहराच्या बाजारपेठेची आर्थिक उलाढाल वाढविण्यासाठी कोपरगाव शहराला स्वच्छ, सुंदर विकसित करण्याची मला दिलेली जबाबदारी मी पार पाडली असून आता त्यापुढे जावून भविष्यात काम करायचे आहे. कोपरगाव मतदार संघातून समृद्धी महामार्ग जात आहे. रेल्वे स्टेशन आणि विमानतळ देखील आहे. त्याचा फायदा बाजारपेठेसाठी कसा करून घेता येईल यासाठी प्रयत्न करणार आहे.

कोपरगाव शहर विकासाच्या अनेक संकल्पना माझ्याकडे आहेत आणि त्या संकल्पना सत्यात उतरविण्याचा विश्वास देखील माझ्याकडे आहे. त्यामुळे या पाच वर्षात जेवढा विकास झाला त्यापेक्षा जास्त विकास करून दाखवीन. ५ नंबर साठवण तलावामुळे नागरिकांना तीन दिवसाआड नियमित पाणी मिळत असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे.

# महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा उतरविणार

## राणी लंके । कान्हूरपठार येथे घोंगडी बैठक

**● पारनेर । वीरभूमी –** कान्हूरपठार व परिसरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत असून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्यासाठी आपण विधानसभेत आवाज उठवून शास्वत पाणीयोजना मार्गी लावण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावू, अशी ग्वाही महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी दिली.

पारनेर तालुक्यातील कान्हूरपठार येथे आयोजित केलेल्या घोंगडी बैठकीत राणी लंके बोलत होत्या.

बैठकीसाठी चंद्रभान ठुबे, किरण ठुबे, बाबासाहेब घुमटकर, प्रसाद नवले, धनंजय ठुबे, शिवाजी व्यवहारे, सरपंच संध्या ठुबे, गोकुळ काकडे, सागर व्यवहारे, विशाल लोंढे, वैभव साळवे, बापू चत्तर, श्रेयश घोडके, तुषार सोनावळे, सुरज नवले, गणेश तांबे, ज्ञानेश्वर गायखे, श्रीकांत ठुबे, राणी घुमटकर, गीतांजली ठुबे, सुशिला ठुबे, देवराम टेकाडे, आनंदीबाई टेकाडे, अनिता घोडके, लता ठुबे, राजाराम ठुबे, भोमा ठुबे, गणेश



गायखे आदी उपस्थित होते.

लंके म्हणाल्या, सन २०१९ मध्ये खा. निलेश लंके यांना मतदारांनी मोठ्या मताधिक्क्याने विधानसभेत पाठविल्यानंतर त्यांनी त्या पदाला न्याय दिला. मतदारसंघात हजारो कोटी रूपयांची कामे मार्गी लावली. कोणत्याही लोकप्रतिनिधीने मतदारसंघात साडेचार वर्षांच्या कालखंडात इतक्या मोठ्या प्रमाणात विकासकामे केली नाहीत. प्रत्येक गावाला विकास कामे देण्याचा प्रयत्न केला गेला. विकासकामे देताना कोणताही राजकीय अभिनिवेश न ठेवता कामे मंजुर करण्यात आली. असे असतानाही विरोधक विकास कामांबाबत चर्चा करतात ती हस्यास्पद आहे. राज्याचे अर्थमंत्री अजितदादा पवार यांनीच लोकसभा निवडणुकीदरम्यान खा. लंके यांनी मतदारसंघासाठी किती निधी खेचून आणला याबाबत सांगितलेले असताना विकासकामांबाबत स्वतः कडे सांगण्यासारखे काही नसताना नागरिकांची दिशाभूल करण्याचे काम विरोधक करत असल्याचे लंके यांनी सांगितले.

लंके यांचे आगमन झाल्यानंतर त्यांची मुख्य बाजारपेठेतून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करण्यात येत होता. महिलांकडून त्यांचे औक्षण करण्यात येत होते. महिला तसेच कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून ही प्रचाराची सभा नाही तर विजयाची सभा असल्याचा अभास होत असल्याचे लंके यांनी सांगितले.

सन २०१२ मध्ये पंचायत समितीचे उपसभापतीपद, सन २०१७ मध्ये जिल्हा परिषदेचे सदस्यपद तसेच जिल्हा नियोजन समितीचे सदस्यपद आपण भुषविलेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कामाच्या अनुभवामुळे मला जनतेचे प्रश्न ज्ञात आहेत. याच अनुभवाच्या शिदोरीवर पारनेर-नगर मतदारसंघाच्या विविध पश्नांवर विधिमंडळात आपण आक्रमक भुमिका मांडून खा. नीलेश लंके यांच्याप्रमाणेच विकास अविरत सुरू ठेवणार आहोत.

# शिर्डीत ३२६ तर संगमनेरात ३३१ मतदान यंत्राची सरमिसळ

**● शिर्डी । वीरभूमी–** शिर्डी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पहिली जिल्हास्तरीय तपासणी झालेल्या २७१ मतदान केंद्रांसाठी द्यावयाच्या ३२६ मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया करण्यात आली. निवडणूक निरीक्षक कविथा रामू, निवडणूक निर्णय अधिकारी माणिक आहेर, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थिती ही प्रक्रिया करण्यात आली.

राहाता तहसील येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात झालेल्या या सरमिसळ प्रक्रियेच्यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल मोरे, नगरपालिका मुख्याधिकारी वैभव लोंढे, निवडणूक निरीक्षक संपर्क अधिकारी श्रीनिवास वर्पे, नायब तहसीलदार मनोज भोसेकर व बाळासाहेब मुळे आदी उपस्थित होते.

शिर्डी विधानसभा मतदारसंघाच्या आवश्यकतेनुसार ३२६ बॅलेट युनिट,



३२६ कंट्रोल युनिट आणि ३५३ व्हीव्हीपॅट यंत्रांची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली. तत्पूर्वी उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना निवडणूक निर्णय अधिकारी आहेर यांनी सरमिसळ प्रक्रियेची माहिती दिली.

शिर्डी विधानसभा मतदार संघासाठी मतदान केंद्राच्या १२० टक्के प्रमाणात बॅलेट आणि कंट्रोल युनिट, तर १३० टक्के प्रमाणात व्हीव्हीपॅट यंत्रे प्राप्त झाली आहेत. ही यंत्रे स्ट्राँग रूममध्ये पोलीस सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आली आहेत. दुसरी सरळमिसळ प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना स्ट्राँग रूममध्ये घेऊन जाऊन दाखविण्यात आली. १० नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून ही यंत्रे मतदानाच्या दृष्टीने तयार करण्याच्या प्रक्रियेला सुरूवात होणार आहे.

**● संगमनेर । वीरभूमी–** संगमनेर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पहिली जिल्हास्तरीय तपासणी झालेल्या २८८ मतदान केंद्रांसाठी द्यावयाच्या ३४५ मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया करण्यात आली. निवडणूक निरीक्षक हौलीनलाल गौईटे, निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश हिंगे, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थिती ही प्रक्रिया करण्यात आली.

संगमनेर येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात झालेल्या या सरमिसळ प्रक्रियेच्यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी धीरज मांजरे व संतोष कोरे उपस्थित होते.

संगमनेर विधानसभा मतदारसंघाच्या आवश्यकतेनुसार ३४५ बॅलेट युनिट, ३४५ कंट्रोल युनिट आणि ३७५ व्हीव्हीपॅट यंत्रांची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली. तत्पूर्वी



उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना निवडणूक निर्णय अधिकारी हिंगे यांनी सरमिसळ प्रक्रियेची माहिती दिली.

संगमनेर विधानसभा मतदार संघासाठी मतदान केंद्राच्या १२० टक्के प्रमाणात बॅलेट आणि कंट्रोल युनिट, तर १३० टक्के प्रमाणात व्हीव्हीपॅट यंत्रे प्राप्त झाली आहेत. ही यंत्रे स्ट्राँग रूममध्ये पोलीस सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आली आहेत. दुसरी सरळमिसळ प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना स्ट्राँग रूममध्ये घेऊन जाऊन दाखविण्यात आली, असे श्री. हिंगे यांनी सांगितले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com